# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५

E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ 869/२०२६

दि.22/०७/२०२६

## परिपत्रक

विषय:- विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयातील शिक्षकांच्या विविध प्रकारच्या रजासंदर्भातील Statutes S.39 ते S.56 यांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोंडवाना युनिव्हरसिटी टिचर्स असोसिएशन, चंद्रपूर यांचे पत्र क्र./BAGUTA /३१९/२०२६, दि. ०९/०७/२०२६.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शिक्षकांचे सेवा पुस्तके व विविध प्रकारच्या रजेसंदर्भात संदर्भीय पत्रामध्ये दिलेल्या बाबींचा विचार करुन नियमाप्रमाणे कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा विद्यापीठास सादर करावा.

सहपत्र:- संदर्भीय पत्र संलग्नित.

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,

(श्री. दिनेश नरोटे)
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. अध्यक्ष/सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोंडवाना युनिव्हरसिटी टिचर्स असोसिएशन, चंद्रपूर.

Scanned with OKEN Scanner

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 9625 10/7/26



# Dr BABASAHEB AMBEDKAR GONDWANA UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION, CHANDRAPUR

Reg. No.- NGP-5249

| President | Vice-Presidenti | Secretary | Treasurer |
|---|---|---|---|
| Prof. Sudhakar D. Petkar | Dr. Esadas R. Bhadke | Dr. Pramod S. Shambharkar | Dr. Prakash B. Titare |
| Mob. 9657380348 | Mob. 9096364886 | Mob. 9822937264 | Mob. 9881597820 |

**Advisors Committee**

- Dr. P. D. Nimsarkar
- Dr. Pramod Katkar
- Dr. Rajesh R. Dahegaonkar
- Dr. D. M. Karade
- Prof. Ranjit Wankhede
- Dr. Y. B. Gedam
- Dr. R. B. Meshram
- Dr. Sanjay B. Urade
- Dr. Anmol T. Shende
- Dr. H. C. Weskade
- Prof. Kartik R. Patil
- Dr. S. S. Dudhe
- Prof. Sanjay Latelwar
- Dr. Anita Walke
- Dr. R. M. Thombre
- Dr. Niraj Khobragade
- Prof. A. V. Pandhare

**Excecutive Member**

- Dr. Vidyadhar D. Bansod
- Dr. N.S.Wadhave
- Dr. Vilas G. Petkar
- Prof. Ku. Mrudula N. Raipure
- Prof. Kundan C. Patil
- Dr. Rejendra V. Barsagade
- Dr. Milind R. Jambhulkar
- Prof. Nitin R. Ramteke
- Dr. Ravidranath M. Patil
- Prof. Ravi Walke
- Dr. Hemchand Dudhgawli
- Dr. Sudhir Bhagat
- Prof. D. T. Dongre
- Prof. Prakash Watti
- Dr. C. K. Dongre
- Prof. Sheetal Jambhule

Ref. No. BAGUTA/319/2026 Date : 09.07.2026

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 874 दिनांक 10.7.2026
जावक क्र. .............. दिनांक ..............

प्रति,

मा. कुलगुरू महोदय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :** गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना शिक्षकांच्या विविध प्रकारच्या रजासंदर्भातील **Statutes S.39 ते S.56** यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत तसेच प्रत्येक शिक्षकाच्या सेवा पुस्तकात (Service Book) अर्जित रजा (Earned Leave) व अर्धवेतन रजा (Half Pay Leave) यांची वार्षिक नोंद ठेवण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्याची विनंती.

**संदर्भ :** १. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे पत्र क्र. **GUG/Reg./1086**, दिनांक **27/02/2018.**

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(१०) सह वाचनार्थ कलम ७१(२०) अन्वये तयार करण्यात आलेले **Statutes S.39 ते S.56.**

**महोदय,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोंडवाना युनिव्हरसिटी, टीचर्स असोसिएशन चंद्रपूर** यांच्या वतीने आपणास सविनय विनंती करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाने संदर्भातील पत्राद्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(१०) सह वाचनार्थ कलम ७१(२०) अन्वये तयार करण्यात आलेले शिक्षकांच्या सेवाशर्ती व विविध प्रकारच्या रजासंदर्भातील **Statutes S.39 ते S.56** विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांना लागू केले आहेत.

मात्र, संघटनेच्या निदर्शनास आले आहे की अनेक संलग्न महाविद्यालयांमध्ये या **Statutes** ची एकसमान व काटेकोर अंमलबजावणी होत नाही. विशेषतः **अर्जित रजा (Earned Leave)** व **अर्धवेतन रजा (Half Pay Leave)** यांची नियमानुसार गणना, सेवा पुस्तकातील नोंदी, वार्षिक अद्ययावतीकरण व शिक्षकांना त्यांच्या रजा खात्याची माहिती देण्याबाबत अनेक ठिकाणी त्रुटी आढळून येत आहेत. परिणामी शिक्षकांना त्यांच्या वैधानिक सेवा लाभांपासून वंचित राहावे लागत असून भविष्यात सेवाविषयक व निवृत्तीविषयक बाबींमध्ये अनावश्यक वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

**Statute S.46 (Earned Leave)** नुसार शिक्षकास एका वर्षातील प्रत्यक्ष सेवेच्या (Actual Service) १/३० **(एक-तिसावा) भागाइतकी अर्जित रजा (Earned Leave)** मिळण्याचा वैधानिक अधिकार आहे. या गणनेमध्ये जास्तीत जास्त **१० दिवसांच्या Vacation कालावधीचा समावेश करता येतो.** याचा सरळ व सोपा अर्थ असा की, शिक्षकाने वर्षभर प्रत्यक्ष सेवा बजावली असल्यास, अर्जित रजा मोजताना Vacation मधील कमाल १० दिवस प्रत्यक्ष सेवेचा भाग म्हणून ग्राह्य धरता येतात; मात्र संपूर्ण Vacation कालावधी प्रत्यक्ष सेवा म्हणून धरता येत नाही.

उ. वि.
10/7/26

President
Dr. Babasaheb Ambedkar
Gondwana University
Teachers Association, Chandrapur

ku. manisha
10/7

Secretary
Dr. Babasaheb Ambedkar
Gondwana University
Teachers Association Chandrapur

Prof.P.S.Shambharkar, Parijat Apartment, F-1, Near S.T. Work Shop, Carmel Academy Road, Tukum, Chandrapur-442401
Mob.9822937264 Email: shambharkar.pramod@gmail.com

Scanned with OKEN Scanner

# Dr BABASAHEB AMBEDKAR GONDWANA UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION, CHANDRAPUR

Reg. No.- NGP-5249

**President** Prof. Sudhakar D. Petkar Mob. 9657380348
**Vice-Presidenti** Dr. Esadas R. Bhadke Mob. 9096364886
**Secretary** Dr. Pramod S. Shambharkar Mob. 9822937264
**Treasurer** Dr. Prakash B. Titare Mob. 9881597820



**Advisors Committee**

- Dr. P. D. Nimsarkar
- Dr. Pramod Katkar
- Dr. Rajesh R. Dahegaonkar
- Dr. D. M. Karade
- Prof. Ranjit Wankhede
- Dr. Y. B. Gedam
- Dr. R. B. Meshram
- Dr. Sanjay B. Urade
- Dr. Anmol T. Shende
- Dr. H. C. Weskade
- Prof. Kartik R. Patil
- Dr. S. S. Dudhe
- Prof. Sanjay Latelwar
- Dr. Anita Walke
- Dr. R. M. Thombre
- Dr. Niraj Khobragade
- Prof. A. V. Pandhare

**Excecutive Member**

- Dr. Vidyadhar D. Bansod
- Dr. N.S.Wadhave
- Dr. Vilas G. Petkar
- Prof. Ku. Mrudula N. Raipure
- Prof. Kundan C. Patil
- Dr. Rejendra V. Barsagade
- Dr. Milind R. Jambhulkar
- Prof. Nitin R. Ramteke
- Dr. Ravidranath M. Patil
- Prof. Ravi Walke
- Dr. Hemchand Dudhgawli
- Dr. Sudhir Bhagat
- Prof. D. T. Dongre
- Prof. Prakash Watti
- Dr. C. K. Dongre
- Prof. Sheetal Jambhule


Ref. No.

Date : ____________

तसेच, Vacation दरम्यान शिक्षकास प्रत्यक्ष कर्तव्य बजावण्याची आवश्यकता भासल्यास, त्या प्रत्यक्ष कर्तव्याच्या कालावधीच्या **१/३ (एक-तृतीयांश) इतकी अतिरिक्त अर्जित रजा** देण्याची स्वतंत्र तरतूद Statute S.46(i)(ब) मध्ये करण्यात आली आहे.

तसेच, Vacation दरम्यान शिक्षकास प्रत्यक्ष कर्तव्य बजावण्याची आवश्यकता भासल्यास, त्या प्रत्यक्ष कर्तव्याच्या कालावधीच्या **१/३ (एक-तृतीयांश) इतकी अतिरिक्त अर्जित रजा** देण्याची स्वतंत्र तरतूद Statute S.46(i)(ब) मध्ये करण्यात आली आहे. प्रत्यक्ष सेवा (Actual Service) मोजताना **Casual Leave, Special Casual Leave, On Duty आणि Duty Leave** यांचा कालावधी सेवेत धरला जातो; परंतु त्याव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या रजांचा कालावधी प्रत्यक्ष सेवेत धरला जात नाही. तसेच अर्जित रजा **३०० दिवसांपर्यंतच साठविता (Accumulate) येते.**

अर्जित रजा (Earned Leave) ही शिक्षकांच्या दीर्घ, सातत्यपूर्ण व प्रत्यक्ष सेवेला मान्यता देणारी वैधानिक सेवा-सुविधा आहे. या रजेचा उद्देश शिक्षकांना त्यांच्या सातत्यपूर्ण सेवेनंतर विश्रांती, आरोग्य पुनर्संचयित करणे, मानसिक व शारीरिक ताण कमी करणे तसेच वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक अथवा इतर आवश्यक कारणांसाठी पुरेसा वेतनासह अवधी उपलब्ध करून देणे हा आहे.

त्यामुळे अर्जित रजा ही कोणतीही सवलत नसून शिक्षकाच्या प्रत्यक्ष सेवेतून अर्जित झालेला वैधानिक हक्क आहे. म्हणून प्रत्येक शिक्षकाच्या अर्जित रजेची अचूक गणना करून तिची नियमितपणे सेवा पुस्तकात नोंद करणे ही प्रत्येक महाविद्यालयाची कायदेशीर व प्रशासकीय जबाबदारी आहे.

त्याचप्रमाणे **Statute S.47 (Half Pay Leave)** नुसार प्रत्येक शिक्षकास प्रत्येक पूर्ण झालेल्या सेवावर्षामागे २० **दिवस अर्धवेतन रजा (Half Pay Leave)** मिळण्याचा वैधानिक अधिकार आहे.

ही रजा संपूर्ण सेवाकाळात कोणत्याही कमाल मर्यादेशिवाय साठविता येते. अर्धवेतन रजा वैद्यकीय अथवा वैयक्तिक कारणासाठी मंजूर करता येते. तसेच भविष्यात **Commuted Leave अथवा Leave Not Due** मंजूर करताना HPL शिल्लक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने HPL ची अचूक नोंद ठेवणे आवश्यक आहे.

याशिवाय **Statute S.22 (Service Book)** नुसार प्रत्येक शिक्षकाचे सेवा पुस्तक शासनाने विहित केलेल्या नमुन्यात ठेवणे बंधनकारक असून त्यामध्ये **Casual Leave वगळता मंजूर झालेल्या सर्व प्रकारच्या रजांची नोंद ठेवणे आवश्यक आहे.**

प्रत्येक वर्षाच्या अखेरीस सेवा पुस्तकातील नोंदी संबंधित शिक्षकास दाखवून त्याची स्वाक्षरी घेणे व सेवा पुस्तक अद्ययावत ठेवणे ही नियुक्ती प्राधिकाऱ्याची वैधानिक जबाबदारी आहे.

**President**
Dr. Babasaheb Ambedkar
Gondwana University
Teachers Association, Chandrapur

**Secretary**
Dr. Babasaheb Ambedkar
Gondwana University
Teachers Association Chandrapur

Prof.P.S.Shambharkar, Parijat Apartment, F-1, Near S.T. Work Shop, Carmel Academy Road, Tukum, Chandrapur-442401
Mob.9822937264 Email: shambharkar.pramod@gmail.com

Scanned with OKEN Scanner



# Dr BABASAHEB AMBEDKAR GONDWANA UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION, CHANDRAPUR

Reg. No.- NGP-5249

| President | Vice-Presidenti | Secretary | Treasurer |
|---|---|---|---|
| Prof. Sudhakar D. Petkar | Dr. Esadas R. Bhadke | Dr. Pramod S. Shambharkar | Dr. Prakash B. Titare |
| Mob. 9657380348 | Mob. 9096364886 | Mob. 9822937264 | Mob. 9881597820 |


**Advisors Committee**

- Dr. P. D. Nimsarkar
- Dr. Pramod Katkar
- Dr. Rajesh R. Dahegaonkar
- Dr. D. M. Karade
- Prof. Ranjit Wankhede
- Dr. Y. B. Gedam
- Dr. R. B. Meshram
- Dr. Sanjay B. Urade
- Dr. Anmol T. Shende
- Dr. H. C. Weskade
- Prof. Kartik R. Patil
- Dr. S. S. Dudhe
- Prof. Sanjay Latelwar
- Dr. Anita Walke
- Dr. R. M. Thombre
- Dr. Niraj Khobragade
- Prof. A. V. Pandhare

**Excecutive Member**

- Dr. Vidyadhar D. Bansod
- Dr. N.S.Wadhave
- Dr. Vilas G. Petkar
- Prof. Ku. Mrudula N. Raipure
- Prof. Kundan C. Patil
- Dr. Rejendra V. Barsagade
- Dr. Milind R. Jambhulkar
- Prof. Nitin R. Ramteke
- Dr. Ravidranath M. Patil
- Prof. Ravi Walke
- Dr. Hemchand Dudhgawli
- Dr. Sudhir Bhagat
- Prof. D. T. Dongre
- Prof. Prakash Watti
- Dr. C. K. Dongre
- Prof. Sheetal Jambhule


Ref. No.

Date : ____________

वरील बाबींचा विचार करून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोंडवाना युनिव्हरसिटी, टीचर्स असोसिएशन चंद्रपूर यांच्या वतीने आपणास नम्र विनंती करण्यात येते की—

१. विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना शिक्षकांच्या रजांसंदर्भातील **Statutes S.39** ते **S.56** ची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत तात्काळ परिपत्रक निर्गमित करण्यात यावे.

२. सर्व प्राचार्यांना **Statute S.46** नुसार प्रत्येक शिक्षकाची अर्जित रजा (Earned Leave) दरवर्षी प्रत्यक्ष सेवेच्या आधारे अचूकपणे मोजून तिची नोंद ठेवण्याचे निर्देश देण्यात यावेत.

३. सर्व प्राचार्यांना **Statute S.47** नुसार प्रत्येक पूर्ण झालेल्या सेवावर्षासाठी २० दिवस अर्धवेतन रजा (Half Pay Leave) नियमितपणे शिक्षकाच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

४. प्रत्येक शिक्षकाच्या **Service Book** व **Leave Account** मध्ये दरवर्षी अर्जित रजा (EL) व अर्धवेतन रजा (HPL) यांचे **Credit, Availed Leave** व **Balance** यांची स्वतंत्र व अद्ययावत नोंद करणे बंधनकारक करण्यात यावे.

५. प्रत्येक वर्षाच्या अखेरीस संबंधित शिक्षकास त्याच्या रजा खात्याची पडताळणी करून त्याची स्वाक्षरी घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

६. सर्व महाविद्यालयांकडून या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत **Compliance Report** विद्यापीठाकडे मागविण्यात यावा.

शिक्षकांचे वैधानिक सेवा हक्क अबाधित राहावेत, सर्व संलग्न महाविद्यालयांमध्ये रजा नियमांची एकसमान अंमलबजावणी व्हावी, सेवा पुस्तके व रजा खाती अद्ययावत राहावीत आणि भविष्यातील सेवाविषयक व निवृत्तीविषयक वाद टाळले जावेत, या उद्देशाने वरीलप्रमाणे आवश्यक परिपत्रक तात्काळ निर्गमित करण्यात यावे, ही नम्र विनंती.

आपल्या सकारात्मक व तातडीच्या कार्यवाहीची अपेक्षा आहे.

| | |
|---|---|
| **President** | **Secretary** |
| Dr. Babasaheb Ambedkar Gondwana University Teachers Association, Chandrapur | Dr. Babasaheb Ambedkar Gondwana University Teachers Association Chandrapur |


Prof.P.S.Shambharkar, Parijat Apartment, F-1, Near S.T. Work Shop, Carmel Academy Road, Tukum, Chandrapur-442401
Mob.9822937264 Email: shambharkar.pramod@gmail.com



Scanned with OKEN Scanner